लोकमत

# १३,९९५ घरकुलांना मंजुरी; तुम्ही अर्ज केला का?

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशिम :** मोदी आवास योजना, राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना (ग्रामीण) या दोन योजनेंतर्गत गत दोन महिन्यांत १३ हजार ९९५ घरकुलांना मंजुरी मिळाली असून, बहुतांश लाभार्थींच्या बँक खात्यात पहिल्या टप्प्यातील अनुदानाची रक्कमही जमा करण्यात आली. पात्र लाभार्थीने घरकुलाचा लाभ घेण्यासाठी आवश्यक त्या कागदपत्रांसह संबंधित यंत्रणेकडे संपर्क साधणे आवश्यक आहे.

'सर्वांसाठी घरे २०२४' हे राज्य शासनाचे धोरण असून, त्यानुसार बेघर व कच्च्या घरात वास्तव्य करणाऱ्या पात्र लाभार्थींना सन २०२४ पर्यंत स्वत:चे हक्काचे घर मिळावे यासाठी शासनाच्या विविध घरकुल योजनेतून प्रयत्न सुरू आहेत. जिल्ह्यात प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) सन २०१६-१७ ते २०२१-२२ अंतर्गत एकूण उद्दिष्टानुसार १८३५२ पैकी १८३५२ घरकुले मंजूर करण्यात आली. घरकुलाची कामे पूर्ण होण्यासाठी फेब्रुवारी महिन्यात जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडून विशेष मोहीमही राबविली होती. याचप्रमाणे रमाई आवास योजना, शबरी आवास योजनेंतर्गतची अपूर्ण घरकुलांची कामे मार्गी लावण्यासाठीदेखील या विशेष मोहिमेत विशेष कार्य करण्यात आले.

## जिल्ह्यात दोन महिन्यांत १३९९५ घरकुले मंजूर

जिल्ह्यातील जानेवारी व फेब्रुवारी या दोन महिन्यांत मोदी आवास योजना व रमाई आवास योजनेंतर्गत १३ हजार ९९५ घरकुलांना मंजुरी देण्यात आली. त्यामुळे या घरकुलांची कामे सुरू होण्यातील अडथळा दूर झाला.



## अर्ज कोठे, कसा कराल?

- शबरी आवास योजनेंतर्गत संबंधित ग्रामपंचायतींमार्फत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अकोला येथे अर्ज करावा.
- रमाई आवास, मोदी आवास व प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत संबंधित ग्रामपंचायतींमार्फत पंचायत समिती कार्यालयाकडे अर्ज सादर करावे.

## कोणत्या योजनेत किती?

### रमाई घरकुल आवास योजनेत १५४० :

रमाई आवास घरकुल योजनेत मागील दोन महिन्यांत १५४० घरकुलांना मंजूरी देण्यात आली.

### प्रधानमंत्री आवास योजना :

मागील दोन वर्षांत प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत जिल्ह्याला उद्दिष्ट प्राप्त झाले नाही.

### मोदी आवास योजनेत १२४५५ :

मोदी आवास योजनेंतर्गत जिल्ह्यात मागील दोन महिन्यांत १२४५५ घरकुलांना मंजुरी देण्यात आली.



जिल्ह्यात विविध घरकुल योजनांची (ग्रामीण) प्रभावी अंमलबजाव. सुरुवात करावी. बांधकामाच्या टप्प्यानुसार अनुदानाचा लाभ वेळेवर देण्याच्या सूचना पंचायत समितीच्या संबंधितांना दिलेल्या आहेत.

- किरण कोवे, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद वाशिम

नवराष्ट्र

**आवास योजना** • जिल्ह्यातील आठ हजारांवर कुटुंबांना मोदी आवासचा लाभ; जिल्हाभर विशेष मोहीम

# लाभार्थ्यांना घरकुलाचा पहिला हप्ता वाटप

**वाशीम,** (श. प्र.). पंतप्रधान नरेंद्र मोदी नुकतेच यवतमाळ येथे आले असताना त्यांच्या हस्ते जिल्ह्यातील एकूण 8 हजार 339 लाभार्थ्यांना मोदी आवास घरकूल योजनेचा पहिला हप्ता ऑनलाइन पद्धतीने लाभार्थ्यांच्या खात्यात वितरीत करण्यात आला. त्यामुळे या घरकुलाच्या बांधकामांना सुरुवात झाली असून ती लवकरच पूर्ण करण्यासाठी व लोकांना हक्काचे घर देण्यासाठी जि. प. चे सीईओ वैभव वाघमारे यांच्या मार्गदर्शनात प्रकल्प संचालक किरण गणेश कोवे यांच्यासह जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेची संपूर्ण टीम परिश्रम घेत आहे.





जिल्ह्यात मोदी आवास योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. पंतप्रधानमंत्र्यांच्या हस्ते जिल्ह्यातील 8339 लाभार्थ्यांना मोदी आवास योजनेचा पहिला हप्ता वितरित करण्यात आला आहे. ही कामे वेगाने पूर्ण होण्यासाठी सर्व लोकप्रतिधींनी पाठपुरावा करावा.

–चंद्रकांत ठाकरे, अध्यक्ष जिल्हा परिषद, वाशीम.



जिल्ह्यातील लाभार्थ्यांनी मोदी आवास योजनेसह इतरही घरकूल योजनांचा लाभ घेऊन आपले घर बांधून पूर्ण करून घ्यावे. जिल्ह्यातील एकही लाभार्थी घरकुलापासून वंचित राहू नये यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत. याबाबत काहीही अडचण आल्यास जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेशी संपर्क करावा.

–वैभव वाघमारे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. वाशीम.



जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या माध्यमातून मोदी आवास घरकूल योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तालुकास्तरावर गटविकास अधिकारी, त्यांचे अधिनस्त संपर्क अधिकारी, विस्तार अधिकारी, सर्व ग्रामविकास अधिकारी, ग्रामसेवक, डाटा एन्ट्री ऑपरेटर, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता (आरएचई) यांच्यामार्फत यशस्वीपणे कालबद्ध कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

–किरण कोवे, प्रकल्प संचालक, डीआरडीए.

सर्वांसाठी घरे 2024 हे राज्य शासनाचे धोरण असून त्यानुसार बेघर तसेच कच्च्या घरात राहणाऱ्या पात्र लाभार्थ्यांना स्वतःचे हक्काचे घर मिळवून देण्यासाठी जिल्हाभर विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. ग्रामीण भागातील बेघरांना घरकूल उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत विविध घरकूल योजना राबविण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे ग्रामीण गृहनिर्माण कार्यक्रमांतर्गत भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. पं. दीनदयाल उपाध्याय घरकूल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना तसेच निवासी प्रयोजनार्थ अतिक्रमणे नियमानुकूल करणे, शासकीय जमिनी विनामूल्य उपलब्ध करून देणे इत्यादी उपक्रम जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात राबविण्यात येत आहेत.

जिल्ह्यातील इतर मागास प्रवर्ग (ओबीसी) आणि विशेष मागास प्रवर्ग (एसबीसी) यांच्यासाठी मोदी आवास घरकूल योजना सुरू करण्यात आली आहे. योजनेकरीता जिल्हयासाठी उद्दिष्ट प्राप्त झालेले असून त्याच्या अंमलबजावणीसाठी कालबद्ध कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

Washim Buldhana Plus Edition
04 March 2024 Page No. 1
epaper.navarashtra.com

दैनिक विदर्भ जगत
www.vidarbhajagat.in
03 Mar 2024 - Page 4

## ● वाशिम जिल्हयातील आठ हजारांवर कुटुंबांना मोदी आवासचा लाभ

# प्रधानमंत्री यांच्या हस्ते घरकुलाचा पहिला हप्ता वितरीत

**विदर्भ जगत, वृत्तसेवा**

● फुलचंद भगत

**वाशिम :** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी नुकतेच (दि. 28) यवतमाळ येथे आले असतांना त्यांच्या हस्ते जिल्ह्यातील एकुण ८ हजार ३३९ लाभार्थ्यांना मोदी आवास घरकुल योजनेचा पहिला हप्ता (ऑनलाईन पध्दतीने) लाभार्थ्यांच्या खात्यात वितरीत करण्यात आला. त्यामुळे या घरकुलाच्या बांधकामांना सुरुवात झाली असुन ती लवकरच पूर्ण करण्यासाठी व लोकांना हक्काचे घर देण्यासाठी जि. प. चे सीईओ वैभव वाघमारे यांच्या मार्गदर्शनात प्रकल्प संचालक किरण गणेश कोवे यांच्यासह जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणेची संपूर्ण टिम मेहनत घेत आहे. "सर्वांसाठी घरे २०२४" हे राज्य शासनाचे धोरण असून त्यानुसार बेघर तसेच कच्च्या घरात राहणाऱ्या पात्र लाभार्थ्यांना स्वतःचे हक्काचे घर मिळवुन देण्यासाठी जिल्हाभर विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. ग्रामीण भागातील बेघरांना घरकूल उपलब्ध करुन देण्यासाठी केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत विविध घरकुल योजना राबविण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे ग्रामीण गृहनिर्माण कार्यक्रमांतर्गत भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. पंडीत दिनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना तसेच निवासी प्रयोजनार्थ अतिक्रमणे नियमानुकूल करणे, शासकिय जमिनी विनामुल्य उपलब्ध करुन देणे इत्यादी उपक्रमजिल्ह्यात मोठ्या प्रमाणात राबविण्यात येत आहेत. जिल्ह्यातील इतर मागास प्रवर्ग (ओबीसी) आणि विशेष मागास प्रवर्ग (एसबीसी) यांच्यासाठी मोदी आवास घरकुल योजना सुरू करण्यात आली आहे. मोदी आवास घरकुल योजनेकरीता जिल्हयासाठी उद्दिष्ट प्राप्त झालेले असून त्याच्या अंमलबजावणीसाठी कालबद्ध कार्यक्रम राबविण्यात येत आहे.



- "जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणेच्या माध्यमातुन मोदी आवास घरकुल योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तालुकास्तरावर गट विकास अधिकारी, त्यांचे अधिनस्त संपर्क अधिकारी, विस्तार अधिकारी, सर्व ग्राम विकास अधिकारी, ग्रामसेवक, डाटा एन्ट्री ऑपरेटर, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता (आरएचइ) यांचे मार्फत यशस्वीपणे कालबद्ध कार्यक्रम राबविण्यात येत आहे."

  ◆ -किरण गणेश कोवे, प्रकल्प संचालक, डीआरडीए

- "जिल्ह्यातील लाभार्थ्यांनी मोदी आवास योजनेसह इतरही घरकुल योजनांचा लाभ घेऊन आपले घर बांधुन पूर्ण करुन घ्यावे. जिल्ह्यातील एकही लाभार्थी घरकुलापासुन वंचित राहु नये यासाठी विशेष प्रयत्न केले जात असुन याबाबत काहीही अडचण आल्यास जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणेशी संपर्क करावा."

  ◆ – वैभव वाघमारे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. वाशिम

### १५ ते २५ फेब्रुवारीपर्यंत राबविली मोहिम

- मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांच्या मार्गदर्शनात आणि प्रकल्प संचाल किरण कोवे यांच्या नेतृत्वात दि. १५ ते २५ फेब्रुवारी दरम्यान विशेष मोहिम राबविण्यात आली. यामध्ये मोदी आवास योजनेसह प्रधानमंत्री आवास योजना, रमाई तसेच शबरी आवास योजनांचा समावेश होता. या योजनेमधील मंजूर घरकुलांना जलद गतीने पुर्ण करण्याकरीता "सुक्ष्म नियोजन व तात्काळ अमलबजावणी" हे सुत्र लावण्यात आले होते. याचा चांगला परिणाम पाहावयास मिळाला असल्याचे निरिक्षण प्रकल्प संचालक किरण गणेश कोवे यांनी नोंदविले आहे.
- जिल्ह्यात मोदी आवास योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. देशाचे प्रधानमंत्री मा. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते जिल्ह्यातील ८**९ लाभार्थ्यांना मोदी आवास योजनेचा पहिला हप्ता वितरीत करण्यात आला आहे. ही कामे वेगाने पूर्ण होण्यासाठी सर्व लोकप्रतिधिंनी पाठपुरावा करावा."

  ◆ -चंद्रकांत ठाकरे, अध्यक्ष जिल्हा परिषद वाशिम

# वाशिम Live
देशोन्नती

॥ रविवार, दि. ३ मार्च २०२४ ॥ https://www.deshonnati.com



सोने - १० ग्रॅम - 62,700
चांदी - १ किलो - 71,500
श्री रुक्मणी ज्वेलर्स

सोने - २४ कॅरेट - 63200
सोने - २२ कॅरेट - 61935
चांदी - १ किलो - 72000
एस. एस. खरोटे
सुवर्णकार, गांधी चौक, अकोला


## दिनविशेष

३ मार्च


ठळक घटना / घडामोडी

- १८३९: आधुनिक औद्योगिक भारताचे शिल्पकार व टाटा उद्योग समूहाचे संस्थापक जमशेटजी नसरवानजी टाटा यांचा जन्म.
- १९३८: सौदी अरेबिया मध्ये खनिज तेलाचा शोध लागला.
- २०००: मराठी चित्रपट अभिनेते राजा गोसावी यांचे निधन.
- २००५: स्टीव्ह फॉसेट यांनी 'ग्लोबल फ्लायर' या ...

# आवास लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरित

## जिल्ह्यातील ८ हजार ३३९ लाभार्थ्यांना मोदी आवास योजनेचा मिळाला लाभ

देशोन्नती वृत्तसंकलन...



> जिल्ह्यातील लाभार्थ्यांनी मोदी आवास योजनेसह इतरही घरकुल योजनांचा लाभ घेऊन आपली घर बांधून पूर्ण करून घ्यावे. जिल्ह्यातील एकही लाभार्थी घरकुलापासून वंचित राहू नये यासाठी विशेष प्रयत्न केले जात असून याबाबत काहीही अडचण आल्यास जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेशी संपर्क करावा.
>
> वैभव वाघमारे
> जि.प. मुकाअ

वाशिम ■ ...

लोकमत

# बेघरांना जागा मिळाली; बँड लावून घरकुलाचे काम सुरू!

## सुकळी येथे मिळाले होते ८६ घरांचे उद्दिष्ट : एका वर्षाचा 'प्रोजेक्ट'

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशिम :** राहायला घर नाही, स्वतःची जागाही नाही, अशा सुकळी येथील पारधी समाजातील लाभार्थींना घरकुलाचा लाभ देण्यासाठी एका वर्षापूर्वी 'प्रोजेक्ट' हाती घेण्यात आला. एका वर्षात सर्व प्रशासकीय सोपस्कार पूर्ण झाल्यानंतर गुरुवारी (दि. २९ ) पहिल्या टप्प्यात बॅण्ड लावून २५ घरकुलांच्या कामाला प्रत्यक्षात सुरुवात झाली आहे.

राज्यात घरकूल योजना राबविली जाते. वाशिम तालुक्यातील सुकळी येथील पात्र असलेल्या बेघर लाभार्थी यांच्याकडे स्वतःची जमीन नसल्याने घरकूल बांधकामात फार मोठ्या अडचणी निर्माण झाल्या होत्या. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी वासुमना पंत आणि जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक किरण कोवे यांनी याकरिता एक प्रोजेक्ट करण्याचे ध्येय ठेवले होते. हा प्रोजेक्ट यशस्वी करण्याची जबाबदारी गटविकास अधिकारी गजानन खुळे यांच्यावर सोपवली होती. सुकळी येथे बहुसंख्य पारधी समाज गेल्या ४० वर्षांपासून राहतो. त्यांच्याकडे स्वतःची जमीन उपलब्ध नाही. अनेक वर्षांपासून सरकारी जागेवर अतिक्रमण करून राहतात. स्वतःकडे जागेचा नमुना ८ मिळत नाही आणि मिळाला तर भोगवटादार म्हणून मिळतो. पारधी समाज हा भटका आणि सामाजिक, शैक्षणिकदृष्ट्या आजही मागासलेला आहे. खऱ्या अर्थाने त्यांचे पुनर्वसन स्थायी स्वरूपात होणे गरजेचे होते. याकरिता सुकळी येथील गावठाण लागून असलेली संजय भोयर यांची जमीन आहे.



त्यांची जमीन घेऊन या समाजाला घरकूल योजना अंतर्गत घरे देण्याचा प्रकल्प तयार करण्यात आला. पारधी समाज आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्याने त्यांना जमिनीकरिता आर्थिक साहाय्य देणे आवश्यक होते. याकरिता जमीन अकृषिक करणे, मोजणी इत्यादी नियोजन करण्याकरिता वाशिमचे गटविकास अधिकारी गजानन खुळे यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली. या प्रकल्पांतर्गत पहिल्या टप्प्यात २५ लाभार्थी यांना पंडित दीनदयाळ योजनेमधून १ लाखांचे अर्थसाहाय्य देण्यात आले. एकूण ८६ घरांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, चार महिन्यांत पहिल्या टप्प्याचे भूमिपूजन वैभव वाघमारे, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते गुरुवारी करण्यात आले. यावेळी प्रकल्प संचालक किरण कोवे, वाशिमचे गटविकास अधिकारी गजानन खुळे आदींची उपस्थिती होती.

### लाभार्थ्यांचे चेहरे फुलले, वाजत गाजत बांधकाम सुरू केले!

संजय भोयर यांच्याकडून जागा घेऊन आणि पंडित दीनदयाळ योजनेंतर्गत लाभार्थ्यांना १ लाखाचे अर्थसाहाय्य देण्यात आल्याने आठ अचा प्रश्न निकाली निघाला. यामुळे लाभार्थींचे चेहऱ्यावर हास्य फुलले. लाभार्थ्यांनी बँडच्या गजरात वाजत गाजत मंजूर झालेल्या घरकुलाचे बांधकाम सुरु केल्याचे चित्र पहावयास मिळाले.

सुकळी येथील बेघर लाभार्थींना घरकुलाचा लाभ देताना आलेल्या अडचणींवर वरिष्ठांच्या मार्गदर्शनात मात केली. सर्वांच्या सहकार्यातून सुकळीचा हा प्रोजेक्ट यशस्वी करु शकलो. घरकुलासंदर्भात लाभार्थ्यांची गैरसोय होणार नाही, याची दक्षता घेतली जात आहे.

- गजानन खुळे गटविकास अधिकारी वाशिम